दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

जिथे गाव.. तिथे वार्ताहर..!
महाराष्ट्रात
सातारा सांगली कोल्हापूर रायगड सिंधुदुर्ग
जिल्हा,तालुका,शहर आणि ग्रामीण भागामध्ये
पत्रकार /वार्ताहर,छायाचित्रकार आणि जाहिरातदार नेमनेआहेत.
दैनिक जनप्रभात सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
7875613619,883006884
या लोकप्रिय वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
पात्रता
१. समाजसेवेची आवड
२. जनसंपर्क
३. स्मार्ट फोन असणे आवश्यक
४. सोशल मीडियाचा वापर करता येणे
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधीना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.

✻ (आष्टी) वर्धा ✻ गुरुवार, १२ फेब्रुवारी २०२६ ✻ वर्ष ४ थे ✻ अंक ९३ ✻ पृष्ठ ६ ✻ मूल्य ५.०० RNI NO : MAHAR/2022/82242

बृहन्मुंबईच्या नवनियुक्त महापौर व उपमहापौरांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून अभिनंदन

मुंबई, दि. 11 – बृहन्मुंबई महापालिकेच्या महापौरपदी नगरसेविका रितू तावडे व उपमहापौरपदी संजय घाडी यांची निवड झाली. त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोघांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. महापौर, उपमहापौर व सर्व पदाधिकारी या महापालिकेला दिशा देतील व सामान्य मुंबईकरांचे स्वप्न पूर्ण करण्याचे काम करतील. त्यांना पूर्ण ताकद देण्याचे काम आम्ही करू. त्यांच्या माध्यमातून नवीन मुंबई घडविण्याच्या कामाला गती देण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सभागृहात महापौर व उपमहापौर निवड झाल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री शिंदे माध्यमांशी बोलत होते. यावेळी मुंबई शहराचे सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा, माजी खासदार राहुल शेवाळे, आमदार अमित साटम, प्रवीण दरेकर, चित्रा वाघ, आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, रितू तावडे यांच्याकडे एक अनुभवी व अस्सल मराठी चेहरा म्हणून पाहिले जाते. त्यांनी यापूर्वीही मुंबईकरांच्या प्रश्नांकरिता





आक्रमक भूमिका घेतली आहे. यापुढेही त्यांच्या माध्यमातून सरकारने सुरू केलेला मुंबईच्या विकासाचा कार्यक्रम महापालिकेच्या माध्यमातून अतिशय चांगल्या पद्धतीने राबविला जाईल. उपमहापौर संजय घाडी यांच्या अनुभवाचा फायदा महापालिकेला मिळेल. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांना अपेक्षित अशा प्रकारचे प्रशासन महापालिकेच्या माध्यमातून चालविले जाईल. महानगरपालिका ही लोकशाहीचे अंग आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे तेथे प्रशासक होते. तेथे लोकप्रतिनिधींचे लोकशाहीला अपेक्षित राज्य प्रस्थापित झाले याचा मला आनंद आहे. जनसामान्यांना आपले लोकप्रतिनिधी अधिक जवळचे वाटतात, असेही त्यांनी यावेळी सांगितले. या सभागृहाच्या गॅलरीत मी पहिल्यांदाच बसलो. अशा प्रकारे मी पहिल्यांदाच सभागृहाचे कामकाज पाहिले आहे. अशा ऐतिहासिक व वारसा असलेल्या वास्तूमध्ये महत्त्वाच्या सोहळ्याचे साक्षीदार होणे हे महत्त्वाचे असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, अतिशय कार्यक्षम महापौर व उपमहापौर मिळाले आहेत. गेल्या साडेतीन वर्षात मुंबईच्या विकासाला चालना दिली. त्या कामाची पोचपावती मुंबईकरांनी दिली. विकासाला मुंबईकरांनी स्वीकारले आहे. मुंबई जागतिक दर्जाचे शहर करण्याची भूमिका आहे. मुंबई शहरासाठी जे जे आवश्यक आहे, ते करण्याचे काम आम्ही करू. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त बाळासाहेबांचे स्वप्न पूर्ण करण्याचे काम सरकार करणार. त्यांचे झोपडपट्टीमुक्त मुंबई करण्याचे काम आम्ही सुरू केले आहे. मुंबई खड्डेमुक्त रस्ते, प्रदूषणमुक्त करण्याची आमची भूमिका आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मुंबईला फिनटेक कॅपिटल करण्याचे स्वप्न पाहिले आहे, ते पूर्ण करण्याचे काम शासन करेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती प्रकल्पासाठी आवश्यक कार्यवाही त्वरीत करावी

– पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे

मुंबई, दि. ११ : कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती करण्याच्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रकल्पाला शासनाची मान्यता असून हा प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित होण्यासाठी आवश्यक त्या सर्व अडथळ्यांचे निराकरण करण्यात यावे. तसेच यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात महानगरपालिकेची बाजू सक्षम आणि प्रभावीपणे मांडण्यात यावी, असे निर्देश पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले. मंत्रालयात मंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीस पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, ऊर्जा विभागाचे सहसचिव नारायण कराड, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त किरण दिघावकर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सहसंचालक जगन्नाथ साळुंखे तसेच महसूल व वनविभागाचे अधिकारी उपस्थित होते. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने कांजूरमार्ग येथे 'वेस्ट टू एनर्जी' या कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले आहे. या प्रकल्पातून सुमारे ८,००० मेगावॅट वीज उत्पादनाची क्षमता निर्माण होऊ शकते. शहरात दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्याची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावत त्यापासून ऊर्जा निर्मिती करण्याचा हा अभिनव उपक्रम आहे.



महानगरपालिकेच्या वतीने देवनार येथेही कचऱ्यापासून वीज निर्मितीसाठी ५०० मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प उभारण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

युवक-युवतींना शिक्षण व रोजगाराच्या संधींसाठी वनार्टीचा सर्वंकष रोडमॅप

– इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे

मुंबई, दि. ११ : विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील युवक-युवतींना शिक्षण व रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्थेचा (वनार्टी) सर्वंकष रोडमॅप तयार करावा. वनार्टीचा रोडमॅप युवक-युवतींना शिक्षण, कौशल्य आणि रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल असे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सांगितले.

इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली वनार्टीच्या संचालक मंडळाची पहिली बैठक झाली. या बैठकीस सहसचिव सुनील तुंबारे, वनार्टीचे प्र. व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे तसेच संचालक मंडळातील सदस्य दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे म्हणाले, महाज्योतीच्या धर्तीवर वनार्टीमार्फत २ हजार विद्यार्थ्यांना यूपीएससी, एमपीएससी, स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. शेती व उद्योग क्षेत्रात ३५० विद्यार्थ्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येईल.



संस्थेच्या कामकाजात पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी अंतर्गत लेखापरीक्षण धोरण, लेखांकन धोरण आणि कर्मचारी भरती आराखड्याला मंजुरी देण्यात आली. कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत विविध विषयांमध्ये प्रशिक्षण देण्याबाबतही संचालक मंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांना पारंपरिक शिक्षणासोबतच व्यावहारिक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या बैठकीत संस्थेच्या विविध योजनांना मंजुरी देताना चालू आर्थिक वर्षासाठी तसेच, २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी निधीचा प्रस्ताव सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला. राष्ट्रीय स्तरावरील संस्थांशी करार करून गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण देण्यासही मान्यता देण्यात आली.

सायक्लोथॉन उपक्रमातून देशाची एकात्मता आणि अखंडत्वाचे दर्शन

– विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर

'वंदे मातरम् : सुरक्षित तटम समृद्ध भारतम्' सायक्लोथॉन उपक्रम

मुंबई, दि. ११ : विविध सुरक्षा दलांमुळे देशात विविध भाषा, संस्कृती असतानाही राष्ट्रीय एकात्मता आणि अखंडत्व कायम आहे. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या 'वंदे मातरम् : सुरक्षित तटम समृद्ध भारतम्' सायक्लोथॉन उपक्रमातून देशाच्या एकात्मता आणि अखंडत्वाचे दर्शन घडत आहे, असे प्रतिपादन विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर यांनी केले.

केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या (सीआयएसएफ) वतीने गेट वे ऑफ इंडिया परिसरात आयोजित सायक्लोथॉन उपक्रमातील सायकलपटूंच्या स्वागत कार्यक्रमात विधानसभा अध्यक्ष ॲड. नार्वेकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचे महासंचालक प्रवीण रंजन, अतिरिक्त महासंचालक पद्माकर रणपिसे, विजय कुमार, क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर, दिग्दर्शक बोनी कपूर, अभिनेता अहान शेट्टी, विश्वचषक विजेत्या १९ वर्षाखालील क्रिकेट संघाचा कर्णधार आयुष म्हात्रे उपस्थित होते. विधानसभा अध्यक्ष ॲड. नार्वेकर म्हणाले, भारताने जगाला अनेक तत्वे दिली आहेत. त्यापैकी जग हे एक कुटुंब असल्याचे 'वसुधैव कुटुंबकम' तत्व आहे. विकसित भारतासाठी सुरक्षा दलांचे मोठे सहकार्य राहणार आहे. भारत हा जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. लवकरच आपण तिसऱ्या स्थानावर झेप घेणार आहोत. आज आपण या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार झालो आहोत. सीआयएसएफने देशाच्या प्रगतीत मोठे योगदान दिले आहे. देशाच्या अंतर्गत सुरक्षेत सीआयएसएफचे कार्य उल्लेखनीय आहे. सायक्लोथॉन हा उपक्रम लोकपयोगी आहे. महासंचालक प्रवीण रंजन



म्हणाले, प्रत्येक व्यक्तीच्या मनात राष्ट्र भावना जागृत करणे हा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा संकल्प आहे. या संकल्पपूर्तीसाठी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल देशाच्या एकात्मतेसाठी सागरी किनारी भागात हा उपक्रम राबवित आहे. सीआयएसएफची ४७ युनिट सागरी किनारी भागात आहे. किनारी गावांमध्ये सागरी सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण करण्यात येत आहे. ग्रामस्थांशी संवाद करून त्यांच्या अडचणी जाणून घेत त्यांना सागरी सुरक्षेविषयी जागरूक करण्यात येत आहे. गुजरातमधील लखपतपासून सुरू झालेला सायकलपटूंचा २ हजार ३५ किलोमीटरचा प्रवास पूर्ण झाला असून अजून १३०० किलोमीटर प्रवास पूर्ण व्हायचा आहे. तसेच पूर्व भागात सायकलपटूंचे पथक चेन्नई येथे पोहचणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

अतिरिक्त महासंचालक पद्माकर रणपिसे म्हणाले, सागरी किनारी मार्गावरील छोट्या गावांमध्ये सायकलपटू रात्रीचा मुक्काम करीत आहेत. या उपक्रमातून सागरी सुरक्षेचा संदेश प्रभावीपणे जात आहे. सायकलपटूंच्या पथकामध्ये ५० टक्के महिला शक्ती आहे. क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर यांनी सायकलपटू केवळ सागरी सुरक्षेचा संदेशच देत नाही, तर पर्यावरण संवर्धन, शारीरिक सुदृढतेचा संदेशही देत असल्याचे सांगितले. दिग्दर्शक बोनी कपूर यांनी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल देशातील महत्वाची सार्वजनिक ठिकाणे सुरक्षित ठेवत असून सर्व विमानतळे त्यांच्यामुळे सुरक्षित असल्याचे सांगितले. या उपक्रमाची परंपरा पुढेही कायम राहील. 'वंदे मातरम्' च्या राष्ट्रीय गाण्याचे महत्त्व या उपक्रमातून पटवून दिले जात असल्याचे गौरवोद्गारही त्यांनी काढले. अभिनेता अहान शेट्टी यांनी सायकलपटूंचे अभिनंदन केले. उपमहानिरीक्षक श्रीमती ममता राहुल यांनी प्रास्ताविकात उपक्रमाची माहिती दिली. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले होते. कार्यक्रमाला सायकलपटू, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचे अधिकारी, नागरिक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

संपादकीय...

क्षेत्र कुठलेही असो, तुमचा प्रभाव पडू लागला की बदनामी अटळ आहे!

समाजात एखादी व्यक्ती, संस्था किंवा विचारधारा शांतपणे, न बोलता आपले काम करत असते तो पर्यंत ती फारशी कुणाच्या नजरेत येत नाही. पण ज्या क्षणी त्या कामाचा परिणाम दिसू लागतो, लोकांच्या जीवनात बदल घडू लागतो, प्रश्न विचारले जाऊ लागतात, तेव्हा त्या प्रभावाची पहिली किंमत द्यावी लागते बदनामीच्या स्वरूपात. कारण प्रभाव हा केवळ प्रगतीचा सूचक नसतो; तो विद्यमान सत्ताकेंद्रांना, सोयीस्कर व्यवस्थेला आणि जडलेल्या हितसंबंधांना दिलेला थेट आव्हान असतो. इतिहास साक्षी आहे, प्रभावी माणसाची बदनामी ही अपघात नसून नियोजनबद्ध प्रक्रिया असते, कारण प्रभाव म्हणजे अस्वस्थ करणारी जाणीव. प्रभावी व्यक्ती किंवा विचार समाजाला अस्वस्थ करतो. तो लोकांना प्रश्न विचारायला शिकवतो, स्वीकारलेली गुलामी नाकारायला भाग पाडतो, आणि "हे असेच का?" असा मूलभूत प्रश्न उभा करतो. ही अस्वस्थता अनेकांना नकोशी असते. कारण प्रश्न विचारणारा समाज म्हणजे हुकूमशाही, अन्याय आणि शोषणासाठी धोक्याची घंटा. म्हणूनच ज्या क्षणी तुमचा प्रभाव वाढू लागतो, त्या क्षणी तुमच्याविरोधात संशय निर्माण केला जातो, तुमच्या हेतूंवर प्रश्नचिन्ह उभे केले जाते, आणि हळूहळू तुमची प्रतिमा मलिन करण्याचे उद्योग सुरू होतात. आजच्या काळात बदनामी ही तलवारीसारखी समोरून चाल करून येत नाही; ती विषासारखी हळूहळू शरीरात भिनते. कुजबुज, अफवा, अर्धसत्य, अतिशयोक्ती, जुने संदर्भ तोडून मांडणे ही बदनामीची आधुनिक हत्यारे आहेत. सोशल मीडियाच्या युगात तर बदनामीला वेग आणि व्याप्ती दोन्ही मिळाले आहेत. एका क्लिकवर तुमच्यावर आरोप, एका पोस्टवर तुमचा चारित्र्यहनन, आणि एका व्हिडिओत तुमच्या संपूर्ण कार्याचा अपलाप. सत्य तपासण्याची तसदी न घेता लोक निर्णय देतात. कारण सत्य शोधणे मेहनतीचे काम आहे, तर बदनामी स्वीकारणे सोपे. नेमकी प्रभावी माणसेच लक्ष्य कां होतात? हा प्रश्न महत्वाचा आहे. समाजात अनेक चुकीच्या गोष्टी घडत असतात, अनेक भ्रष्ट, अपयशी, अनैतिक लोक वावरत असतात, पण त्यांच्यावर फारशी टीका होत नाही. मग बोट का रोखले जाते ते नेहमी काम करणाऱ्यांवरच? कारण निष्क्रिय माणूस कुणाचाच शत्रू नसतो. तो व्यवस्थेला धोका नसतो. पण प्रभावी व्यक्ती ही व्यवस्थेच्या कमतरतांचा आरसा दाखवते. ती सांगते "हे शक्य आहे, बदल होऊ शकतो." आणि ही शक्यता अनेकांच्या स्वार्थाला घातक ठरते. म्हणूनच बदनामीचा हेतू एकच असतो, विश्वास तोडणे. लोकांचा विश्वास ढळला, की प्रभाव आपोआप कमी होतो. काम कितीही चांगले असले, तरी संशयाची सावली पडली की समाज मागे सरकतो. इतिहासातील प्रत्येक परिवर्तनाची हीच कथा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर असोत, महात्मा गांधी असोत, महात्मा फुले असोत किंवा आधुनिक काळातील कोणताही समाज परिवर्तनवादी, प्रत्येकाच्या वाट्याला बदनामी आलीच. कुणाला देशद्रोही ठरवले गेले, कुणाला धर्मविरोधी, कुणाला समाजविघातक, तर कुणाला सत्तालोलुप. परंतु इतिहासाने एक गोष्ट स्पष्ट केली, बदनामी क्षणिक असते, प्रभाव टिकून राहतो. कारण बदनामी शब्दांवर उभी असते, तर प्रभाव कृतींवर. बदनामी ही अपयशाची कबुली असते. जेव्हा तुमच्या विचारांना तर्काने, तुमच्या कामाला पर्यायाने, आणि तुमच्या प्रश्नांना उत्तराने पराभूत करता येत नाही, तेव्हा शेवटचा उपाय म्हणजे व्यक्तीवर हल्ला. हा हल्ला म्हणजेच बदनामी. म्हणजेच बदनामी ही प्रत्यक्षात तुमच्या अपयशाची नाही, तर तुमच्या विरोधकांच्या अपयशाची कबुली असते. त्यांना तुमच्याशी वैचारिक लढाई जिंकता आली नाही, म्हणून त्यांनी चारित्र्यहननाचा मार्ग स्वीकारला. इथेच प्रभावी माणसाची कसोटी लागते. बदनामीला घाबरून तो माघार घेतो का? की सत्याच्या मार्गावर ठाम राहतो? अनेकजण इथेच थकतात. कारण बदनामी वेदनादायी असते. ती केवळ प्रतिमेवर नाही, तर मनावर, नात्यांवर आणि आत्मविश्वासावर आघात करते. पण जो माणूस स्वतःच्या हेतूंवर प्रामाणिक असतो, त्याला एक गोष्ट माहीत असते "आज नाही, उद्या नाही, पण एक दिवस सत्य उघड होणारच." फक्त प्रभावी व्यक्तींनीच नाही, तर समाजानेही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. आपण अफवांवर विश्वास ठेवतो का? अर्धसत्य स्वीकारतो का? की प्रश्न विचारतो? कारण बदनामी फोफावते ती प्रेक्षकांच्या मौनामुळे. जर समाज सजग झाला, विवेक वापरू लागला, तर बदनामीचे उद्योग आपोआप निष्प्रभ ठरतील. अन्यथा प्रत्येक नव्या विचाराचा गळा दाबला जाईल आणि समाज स्थैर्याच्या नावाखाली कुजत राहील. म्हणूनच एक गोष्ट स्पष्टपणे सांगावी लागेल की, क्षेत्र कुठलेही असो, तुमचा प्रभाव पडू लागला की बदनामी अटळ आहे. ती भीतीदायक वाटू शकते, त्रासदायक असू शकते, पण ती तुमच्या अपयशाची खूण नाही; ती तुमच्या यशाची चाहूल आहे. इतिहास कधीही बदनामी करणाऱ्यांच्या नावाने ओळखला जात नाही; तो नेहमी प्रभाव टाकणाऱ्यांच्या नावाने लिहिला जातो. म्हणूनच बदनामीच्या गदारोळातही जेव्हा तुम्ही शांतपणे, ठामपणे आणि प्रामाणिकपणे काम करत राहता, तेव्हाच खरा परिवर्तनाचा अध्याय सुरू होतो. कारण शेवटी एकच सत्य उरते, बदनामीची वादळे थांबतात, पण प्रभावाची दिशा इतिहास ठरवतो.

प्रवीण बागडे
नागपूर
मो.क्र. ९९२३६२०९१९

बजाज उद्योगसमूहाचे प्रवर्तक: जमनालाल बजाज!



जमनालालजी बजाज यांनी स्त्रीशिक्षणास अग्रक्रम देऊन स्त्रियांना समान हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्याकरिता वर्धा येथे त्यांनी मारवाडी शिक्षण मंडळाची स्थापना केली. तसेच गांधींच्या मूलोद्योग शिक्षणावर भर दिला आणि राष्ट्रीयतेची भावना जोपासली व अस्पृश्यतानिवारणाचे महान कार्य अंगीकारले. त्यांनी खिलाफत चळवळीतही भाग घेतला होता. अखेरच्या दिवसांत सेवाग्राम आणि गोसेवासंघ या कार्यास त्यांनी स्वतःला वाहून घेतले होते. गांधीवादी मार्गाने स्वराज्य मिळेल, यावर त्यांची दृढ श्रध्दा होती. म्हणूनच त्यांनी खादी, ग्रामोद्योग व गोसेवा यांचा पुरस्कार केला. त्यांच्याबद्दल महत्वपूर्ण संकलित माहिती श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींनी सदर लेखात मांडली आहे... संपादक.



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी. एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप-
९४२३७१४८८३.

जमनालालजी बजाज यांचा जन्म राजस्थानमधील सिकल जिल्ह्यातील कासी का बास या गावात दि.४ नोव्हेंबर १८८९ मध्ये झाला. अवघ्या चार वर्षांचे असताना वर्ध्याचे सेठ बच्छराज बजाज यांनी नातू म्हणून दत्तक घेतले. बच्छराज यांचा वर्धा शहर आणि विदर्भात कापसाच्या रुई गाठींचा व्यवसाय होता. जमनालालजी यांचा वयाच्या तेराव्या वर्षी जानकीदेवी यांच्यासोबत विवाह झाला. त्यावेळी बालविवाहाची प्रथा सर्वत्र प्रचलित होती. जमनालाल व जानकीदेवी या दाम्पत्याने पुढे मात्र या प्रथेविरोधात मारवाडी समाजासह इतर समाजासाठी कार्य केले. जमनालाल यांना बालपणापासूनच विलासी जीवन, श्रीमंती आवडत नसे, ते यात रमत नसत. राष्ट्रवाद त्यांच्या नसानसात वसत होता. लोकमान्य टिळकांच्या केसरीचे ते वाचक होते. १३ वर्षाच्या जमनालाल यांनी आपल्या पॉकेटमनीची बचत करून दान म्हणून १०० रुपये या वर्तमानपत्राला पाठविले होते. या काळातच ते गांधीजींच्या दक्षिण आफ्रिकेतील चळवळीविषयी आकर्षित झाले.

जेव्हा गांधीजी भारतात आले तेव्हा जमनालाल त्यांच्याशी भेटले आणि सतत संपर्कात राहिले. गांधीजींना सन १९३४मध्ये वर्धा, सेवाग्राम येथे आणून कर्मभूमी करण्यास भाग पाडले. त्यासाठी त्यांनी सेवाग्राम व वर्धा येथील मोठी जागाही दिली. जमनालाल बजाज हे एक गांधीवादी देशभक्त व बजाज उद्योगसमूहाचे प्रवर्तक होते. त्यांचा जन्म पूर्वीच्या जयपूर संस्थानातील कासीकाबास या खेड्यात एका गरीब कुटुंबात झाला. वडील कनिराम व आई बिरदीबाई होत. वयाच्या चौथ्या वर्षी जमनालाल वर्ध्याचे बच्छराज बजाज या लक्षाधीशाच्या घरात दत्तक गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण वर्धा येथे झाले. नंतर त्यांनी इंग्रजी, हिंदी, गुजराती या भाषा आत्मसात केल्या; पण कोणतीही पदवी त्यांनी घेतली नाही. विद्यार्थिदशेतच त्यांचा विवाह सन १९०२ साली इंदूर संस्थानातील जावरा येथील शेठ गिरधारीलाल जाजोदिया यांच्या जानकीदेवी या मुलीशी झाला. कमलनयन व रामकृष्ण हे त्यांचे दोन मुलगे. ते उद्योगपती म्हणून ख्यातनाम आहेत. त्यांपैकी कमलनयन हे लोकसभेचे काही वर्षे सभासद होते, ते सन १९७२ मध्ये निवर्तले. जमनालालजींनी स्त्रीशिक्षणास अग्रक्रम देऊन स्त्रियांना समान हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्याकरिता वर्धा येथे त्यांनी मारवाडी शिक्षण मंडळाची स्थापना केली. तसेच गांधींच्या मूलोद्योग शिक्षणावर भर दिला आणि राष्ट्रीयतेची भावना जोपासली व अस्पृश्यतानिवारणाचे महान कार्य अंगीकारले. त्यांनी खिलाफत चळवळीतही भाग घेतला होता. अखेरच्या दिवसांत सेवाग्राम आणि गोसेवासंघ या कार्यास त्यांनी स्वतःला वाहून घेतले होते. गांधीवादी मार्गाने स्वराज्य मिळेल, यावर त्यांची दृढ श्रध्दा होती. म्हणूनच त्यांनी खादी, ग्रामोद्योग व गोसेवा यांचा पुरस्कार केला. आधुनिक भारताच्या औद्योगिक क्षेत्रातही जमनालाल बजाज यांनी स्पृहणीय कामगिरी केली. त्यांनी १९२६ साली बजाज उद्योगसमूहाचा सुसंघटित पाया घातला आणि त्या उद्योगसमूहातर्फे पहिला साखर कारखाना सुरू केला; तथापि एक विश्वस्त म्हणूनच ते बजाज उद्योगसमूहाचे काम पाहत असत. तरूणपणीच जमनालाल यांना लोकमान्य टिळक, पंडित मदनमोहन मालवीय, रवींद्रनाथ टागोर इ.थोर व्यक्तींचा सहवास लाभला. लोकमान्यांचा केसरी वृत्तपत्र ते लहानपणापासून वाचत. सन १९१५मध्ये गांधीजी दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावरून परत आल्यावर बजाज त्यांना भेटले. ते महात्माजींच्या विचारसरणीकडे आकृष्ट झाले आणि आपणास पाचवा मुलगा म्हणून स्वीकारावे, अशी त्यांनी सन १९२०मध्ये गांधीजींना विनंती केली. बच्छराज यांच्याकडून लाभलेल्या संपत्तीचा त्यांनी अपरिग्रह वृत्तीने केवळ एक विश्वस्त म्हणून सांभाळ केला. सन १९०८मध्ये जमनालाल मानसेवी दंडाधिकारी झाले. पुढे सन १९१८मध्ये त्यांना रायबहादूर हा किताब मिळाला. जमनालाल हे सन १९२० सालच्या नागपूर येथील अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष झाले. काँग्रेसचे खजिनदार म्हणून त्यांनी दीर्घकाळ काम केले. त्यांनी असहकार चळवळीत भाग घेऊन आचार्य विनोबा भावे यांच्या नेतृत्वाखाली वर्धा येथे सत्याग्रह आश्रमाची स्थापना केली आणि काँग्रेसच्या ठरावानुसार रायबहादूर या उपाधीचा त्याग त्याच साली केला. सन १९२३मध्ये त्यांनी नागपूर येथे राष्ट्रध्वज सत्याग्रहाचे नेतृत्व केले. त्याबद्दल त्यांना १८ महिन्यांची शिक्षा झाली. त्याच वर्षी गांधीजीचे कार्य पुढे चालू ठेवण्यासाठी त्यांच्या अनुपस्थितीत गांधी सेवकसंघाची त्यांनी स्थापना केली. सन १९२४मध्ये ते नागपूर प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व १९२५ मध्ये चरखा संघाचे खजिनदार होते. त्यांनी समाजसेवेसाठी अनेक संस्था स्थापन केल्या आणि अस्पृश्यतानिवारण, गोवर्धन, शिक्षणसंस्था यांसाठी भरीव आर्थिक मदत केली. अनेक संस्थांचे ते अध्यक्ष व सचिव होते. सस्ता साहित्य मंडळ यादवारे त्यांनी राष्ट्रीय हिंदी साहित्य प्रकाशित केले. सन १९३८मध्ये अखिल भारतीय हिंदी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. काँग्रेसच्या अस्पृश्यतानिवारण मोहिमेत त्यांनी सचिव या नात्याने पुढाकार घेऊन अस्पृश्यता निर्मूलनाचा प्रचार केला आणि सन १९२८मध्ये वर्ध्याचे स्वतःच्या मालकीचे लक्ष्मीनारायण मंदिर हरिजनांना खुले केले. सन १९३०साली विलेपार्ले, मुंबई येथील मिठाच्या सत्याग्रहाचे नेतृत्व त्यांच्याकडे होते. या प्रसंगी त्यांच्या पत्नी जानकीदेवी व मुलगा कमलनयन यांनाही शिक्षा झाल्या. जमनालाल यांनी वर्ध्याजवळील सेगाव हे खेडे व तेथील जमीन गांधीना दिली. तेथे गांधीनी १९३६साली सेवाग्राम आश्रम स्थापन केला. जयपूरच्या संस्थानी प्रजेस राजकीय हक्क मिळावेत, म्हणून त्यांनी सत्याग्रह केला. त्यात त्यांना पुन्हा १९३९ मध्ये शिक्षा झाली. दुसऱ्या महायुध्दकाळात १९४१मध्ये युध्दविरोधी प्रचारांमुळे त्यांना अटक झाली. वर्धा येथे गोसेवा संघाची स्थापना त्यांनी केली होती. त्यांना रक्तदाबाचा विकार होता; त्यातच रक्तस्त्राव होऊन ते दि.११ फेब्रुवारी १९४२ रोजी निधन पावले. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या स्मरणार्थ अनेक संस्था स्थापन करण्यात आल्या. त्यांचे पुत्र रामकृष्ण यांनी जमनालाल प्रतिष्ठान स्थापन केले. त्याच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष भारताचे उपराष्ट्रपती असून रामकृष्ण बजाज हे अध्यक्ष आहेत. भारतातील ग्रामीण भागात विशेष सेवा करणाऱ्या मान्यवर व्यक्ती व संस्था यांना त्याद्वारे पुरस्कार देण्यात येतात.!! **जमनालालजी बजाज यांना लेखरूपी पुण्यस्मरणाने विनम्र अभिवादन !!**

राजे ..

जमले नाही गणित
व्हायचे होते रे राजे
मोडलेल्या तोडल्या
खुर्ची मध्ये विराजे

आपल्याचं घराचे रे
बंद आम्हां दरवाजे
कलक घरात माजे
सनया तुतारी वाजे

फुकट तापला तवा
भाकर सगळे भाजे
फितूर करते आतूर
सैन्यआमचे दुभाजे

संभ्रमात पडे जनता
संशयकल्लोळ माजे
पाठीराखे पाठ सोडे
आपसात सारे झुंजे

सिंहासनाधिष्टीत हो
आपलेचं मामाभांजे
उंची गाठाया प्रयास
करत राहतात खुजे

रात्रंदिवस कार्यमग्न
सभा जोरदार गाजे
छत्री साहेबा डोईवर
सटसट पाय रे भाजे

स्वताला उगाच कसे
रे किंग मेकर समजे
का फेकले दूर वरती
चक्रव्यूह नसे उमजे

– हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

छावणी ..

जोर धरे अधिवेशनी
सुसज्ज करे छावणी
शोधून काढा लफडी
बांधा समस्त दावणी

थंडावल्या वादळाला
पुन्हा देतो चिथावणी
कालबाह्य रद्द बातल
धूळझटके खतावणी

फार्म फ्रेश आहे पहा
किती करी बतावणी
उकरून काढा मुडदे
कार्यकर्त्यां दटावणी

नाचवे जुनी प्रकरणी
ठसकेबाज गंलावणी
वय विसरा कुकर्माचे
करत रहा भुलावणी

जुन्या शिळ्या पदार्था
झणझणीत फोडणी
निषेधांच्या निदर्शनात
सलामी देता झोडणी

पिंज–या बंदिस्तजरी
शब्दातचं डरकावणी
शोधलफडे घेतिकीट
चालूठेव धमकावणी

सांसदीय शब्दनावडे
करत रहा घुस्तावणी
पक्ष बदल आवश्यक
देती अंतीम चेतावणी

– हेमंत मुसरीफ पुणे .
9730306996...

साऊ ज्योती सामाजिक व श्लोक फाउंडेशन संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने शंकर डहाके राज्यस्तरीय आदर्श पुरस्काराने सन्मानित

तालुका प्रतिनिधी (अमोल झाडे)
समुद्रपूर :-

साऊ ज्योती सामाजिक व श्लोक फाउंडेशन संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने शंकर डहाके राज्यस्तरीय आदर्श पुरस्काराने सन्मानित फ्रॉम सुभेदार महेंद्र गवई इंडियन आर्मी महामानवांची व संतांची पावन भूमी, कला व संस्कृती यांनी संपन्न अशी पुणे पुण्यनगरी ही केवळ शहर नाही, तर महाराष्ट्राच्या वैचारिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक आहे. याच पुण्यभूमीत होणाऱ्या राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार सोहळ्यासाठी पात्र ठरलेल्या सर्व मान्यवर पुरस्कारार्थींचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा!आपण ज्या ज्या क्षेत्रात कार्यरत आहात, त्या प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने, सातत्याने आणि प्रामाणिक प्रयत्नांनी समाजासाठी मोलाचे



योगदान दिले आहे. आपल्या कार्यामागील निस्वार्थ भावना, समाजभान, आणि सकारात्मक दृष्टिकोन यामुळेच आपण आज या सन्मानासाठी पात्र ठरलात.महामानवांचे विचार आणि संतांची शिकवण प्रत्यक्ष कृतीत उतरवून समाजात परिवर्तन घडवणारे आपण खऱ्या अर्थाने आदर्श आहात. आपल्या कार्यातून असंख्य लोकांना प्रेरणा मिळाली, दिशा मिळाली आणि नव्या आशेचा मार्ग सापडला. म्हणूनच हा सन्मान केवळ वैयक्तिक नसून, कुटुंबाचा, सहकाऱ्यांचा आणि संपूर्ण समाजाचा गौरव आहे.राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार हा आपल्या आजवरच्या कार्याची दखल तर आहेच, पण भविष्यातील आणखी व्यापक, अधिक प्रभावी कार्यासाठी दिलेले प्रेरणादायी बळ आहे. या सन्मानातून आपली जबाबदारी अधिक दृढ होत असून, पुढील पिढीसाठी आपण प्रेरणास्थान ठरत आहात.या सुवर्णक्षणी आपणास उत्तम आरोग्य, अखंड ऊर्जा, यशस्वी वाटचाल आणि समाजहितासाठी अखंड कार्यसिद्धी लाभो, हीच निसर्ग चरणी प्रार्थना आपल्या कार्याचा उज्ज्वल प्रकाश महाराष्ट्रभरच नव्हे, तर संपूर्ण देशात पसरत राहो. महाराष्ट्राला अभिमान महाराष्ट्राचा गौरव पुन्हा एकदा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कारासाठी पात्र ठरलेल्या सर्व मान्यवर पुरस्कारार्थींचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन, शुभेच्छा विश्वकार्याच्या पुढील वाटचालीस मंगलमय हार्दिक शुभेच्छा.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) **RNI NO : MAHMAR/2022/82242**

श्री शिवाजी विद्यालय जुनियर कॉलेज दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

लोणी प्रतिनिधी (कैलास गायकवाड)

धामणी ता.आंबेगाव येथील रयत शिक्षण संस्थेचे, श्री शिवाजी विद्यालय व ज्युनिअर कॉलेज (शास्त्र) दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभाचा कार्यक्रम विद्यालयात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष उद्योजक श्री विलासजी पगारिया हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य श्री सोमवंशी सर यांनी केले. विद्यार्थ्यांना शुभेच्छा श्री शेंडकर सर, पंचायत समिती माजी सदस्य रवींद्रजी करंजखेले, स्कूल कमिटी सदस्य रामदासजी जाधव, सरपंच अक्षय राजे विधाटे, पत्रकार अंकुश भुमकर सर, मा. सरपंच सागर दादा जाधव, भाऊसाहेब करंडे यांनी दिल्या. १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष उद्योजक विलासजी पगारिया यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा व मार्गदर्शन केले.



१० वी च्या विद्यार्थ्यांनी वर्गासाठी ६ फॅन व वर्ग सजावट करून दिली, १२ वी च्या विद्यार्थ्यांनी ज्युनिअर कॉलेजच्या इमारतीला स्लाइडिंग खिडक्या ६ व लोखंडी खिडक्या ६ असे एकूण ४० हजार किमतीचे साहित्य दिले. तसेच उपस्थित मान्यवर व सर्व विद्यार्थ्यांसाठी जेवणाची व्यवस्था केली. सर्व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन १० वी, ११ वी व १२ वी वर्गशिक्षक व विद्यार्थी यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रुती लबडे व अनुष्का बोराडे या विद्यार्थिनींनी केले. सर्वांचे आभार प्राचार्य श्री सोमवंशी सर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी श्री वामनराव जाधव, श्री भाऊसाहेब कदम,श्री नामदेव मामा वाघचौरे, श्री शांतारामशेठ जाधव, श्री नितीन जाधव, श्री संतोष करंजखेले, श्री सोमनाथ सोनवणे, श्री मनेष जाधव व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते, शिक्षण प्रेमी उपस्थित होते.

सिद्धार्थ नगर ११ आयोजित डि.के. ग्रुप चषक २०२६ स्पर्धा उत्साहात संपन्न

अर्णव इलेव्हन मोठी संघाने पटकाविला प्रथम क्रमांक

दै जनप्रभात उरण तालुका प्रतिनिधी (विठ्ठल ममताबादे)

उरण दि १० सामाजिक कार्य करण्याच्या उद्देशाने व फुले शाहू आंबेडकरी विचाराचा तळागाळात प्रचार व प्रसार व्हावा या अनुषंगाने २०२१ साली सामाजिक कार्यकर्ते दिनेश गायकवाड यांनी डी के ग्रुप ची स्थापना केली. डी के ग्रुपच्या माध्यमातून आजपर्यंत अनेक विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक उपक्रम राबविण्यात आले आहेत.शैक्षणिक साहित्य वाटप, गरजूना साहित्य वाटप असे अनेक कार्यक्रम या संघटनेच्या माध्यमातून राबविण्यात आले असून गोर गरीब जनतेच्या वेगवेगळ्या अडी अडचणी सोडविण्यात आले आहेत.खेळाडूंच्या कलागुणांना वाव मिळावा,त्यांना प्रोत्साहन मिळावे, उरण मधील खेळाडू राष्ट्रीय स्तरावर चमकावेत या हेतूने सिद्धार्थनगर ११ तर्फे उरण कोटनाका, पेट्रोल पंपा पाठीमागील मैदानात भव्य दिव्य असे डि.के.ग्रुप चषक २०२६ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.एकूण तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेत अर्णव ११ मोठी जुई संघाने प्रथम क्रमांक पटकविला असून द्वितीय क्रमांक साई माऊली मोरा,तृतीय क्रमांक विंधणे संघ, मॅन ऑफ द सिरीज विंधणे संघाचा आकाश, उत्कृष्ट फलंदाज म्हणून मोठी जुई संघाचा निनाद याला मान मिळाला आहे. यावेळी डी के ग्रुपचे अध्यक्ष दिनेश गायकवाड, कुणाल म्हात्रे, बळीराम मसन, सनी भोईर, संकेत पाटील, ऋषिकेश कासारे, जयेश गायकवाड, लकी भिसे, नागेश गायकवाड, आदित्य भिसे, प्रेम गायकवाड,बहुजन समाज पार्टीचे उरण तालुका अध्यक्ष सुनिल गायकवाड, बसपाचे रायगड प्रभारी राहुल बेनवाल, विकास निकाळजे आदी मान्यवर उपस्थित होते. सदर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी डी के ग्रुपच्या सर्व पदाधिकारी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली. फुले शाहू आंबेडकर विचारसरणीचा सर्वत्र प्रचार करणाऱ्या या संघटनेतर्फे आरोग्याला जपा निरोगी रहा, खेळा शरीर तंदुरुस्त ठेवा अशी आरोग्य विषयक जनजागृती या स्पर्धेच्या माध्यमातून करण्यात आली आहे.



भारतीय मजदूर संघाचे २१वे त्रैवार्षिक अखिल भारतीय अधिवेशन संपन्न;

नवीन अखिल भारतीय कार्यकारिणीची घोषणा

२५ फेब्रुवारी २०२६ रोजी देशभरातील सर्व राज्यांतील जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी कार्यालये, शासकीय कार्यालये, कामगार कार्यालये व ई-कार्यालयांसमोर धरणे आंदोलन

दै जनप्रभात उरण तालुका प्रतिनिधी (विठ्ठल ममताबादे)

उरण दि ९भारतीय मजदूर संघाचे (BMS) तीन दिवसीय २१वे त्रैवार्षिक अखिल भारतीय अधिवेशन धर्मनगरी जगन्नाथ पुरी येथे यशस्वीरीत्या संपन्न झाले. ६ ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पार पडलेल्या या राष्ट्रीय अधिवेशनात देशभरातील विविध क्षेत्रांतील हजारो प्रतिनिधींनी सहभाग घेतला. अधिवेशनात कामगारांच्या हिताशी निगडित गंभीर राष्ट्रीय प्रश्नांवर सखोल चर्चा व मंथन करण्यात आले.अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणात अखिल भारतीय अध्यक्ष एस. मलेशम यांनी देशातील कामगारविरोधी धोरणांवर तीव्र चिंता व्यक्त केली. त्यांनी जाहीर केले की दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी देशभरातील सर्व राज्यांतील जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी कार्यालये, शासकीय कार्यालये, कामगार कार्यालये व ई-कार्यालयांसमोर धरणा आंदोलन करण्यात येईल.या आंदोलनाच्या माध्यमातून कामगार हितांचे संरक्षण, कामगार संहितांमधील (Labour Codes) आवश्यक सुधारणा, तसेच "सरकार जागे व्हा" या मागणीसाठी जनजागृती करण्यात येणार आहे.नवीन अखिल भारतीय कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.कालावधी २०२६–२०२९ साठी अधिवेशनाच्या अंतिम दिवशी पुढील तीन वर्षांसाठी नवीन अखिल भारतीय



कार्यकारिणीची सर्वसम्मतीने घोषणा करण्यात आली. एस. मलेशम (तेलंगणा) — अखिल भारतीय अध्यक्षसुरेंद्र कुमार पांडे (छत्तीसगड) — महामंत्री बी. सुरेंद्रन — संघटन मंत्रीतसेच महाराष्ट्रातील अनिल ढुमणे यांची अखिल भारतीय सचिव म्हणून , मोहन येणुरे क्षेत्रीय सहसंघटक, जयंत देशपांडे , असंघटित क्षेत्र प्रमुख, शर्मिला पाटील व तृप्ती आळती महिला विभाग प्रमुख निवड जाहीर करण्यात आली.विविध मागणींबाबत सरकार ने सकारात्मक निर्णय न घेतल्यास २५ फेब्रुवारी २०२६ या दिवशी जिल्ह्याधिकारी कार्यालय समोर आंदोलन करून 'सरकार जगाव' देशभर करण्याचा निर्णय करण्यात आला आहेत. याशिवाय अधिवेशनात कंत्राटी कामगार क्षेत्रातील आव्हाने व कामगार सुरक्षेसंदर्भातील विशेष ठराव देखील मंजूर करण्यात आले. या २५ फेब्रुवारी सरकार जगाव आंदोलनात कंत्राटी कामगारांनी मोठ्या संख्येने सहभागी होवून न्याय हक्कां करिता संघर्ष करावा असे आवाहन अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघ सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी केले आहे. महामंत्र्यांचे वक्तव्यनवनियुक्त महामंत्री सुरेंद्र कुमार पांडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की,"भारतीय मजदूर संघ येत्या काळात समाजाच्या शेवटच्या टोकावर उभ्या असलेल्या कामगाराच्या सन्मान व अधिकारांसाठी आपला संघर्ष अधिक तीव्र करेल. आमचे ध्येय केवळ मागण्या मांडणे नसून, राष्ट्रनिर्मितीत कामगारांचा सन्मानजनक सहभाग सुनिश्चित करणे हे आहे." अधिवेशनाचा समारोप देशव्यापी, संघटित व सातत्यपूर्ण संघर्षाच्या दृढ संकल्पाने करण्यात आला.अशी माहीती सचिन मेंगाळे यांनी दिली आहे.

अधिवेशनातील प्रमुख संकल्प व ठराव

अधिवेशनात कामगारांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी खालील महत्त्वाचे ठराव एकमताने मंजूर करण्यात आले—

१)कामगार कायद्यांचे सार्वत्रिकीकरण :कोणताही भेदभाव किंवा अपवाद न ठेवता सर्व श्रेणीतील कामगारांवर कामगार कायदे समानपणे लागू करण्यात यावेत.२)ठेका प्रथेतील सुधारणा :ठेका कामगारांचे शोषण कायमचे थांबवण्यासाठी विद्यमान कायद्यांत कठोर सुधारणा करण्यात याव्यात.३)आंगणवाडी कर्मचाऱ्यांचा सन्मान :आंगणवाडी सेविका व मदतनीस यांना "मानधन"ऐवजी शासकीय कर्मचारी दर्जा, योग्य वेतन व संपूर्ण सामाजिक सुरक्षा लाभ देण्यात यावेत.४)त्रिपक्षीय यंत्रणेची पुनर्बहाली :सरकार, नियोक्ता व कामगार यांच्यातील त्रिपक्षीय संवाद यंत्रणा पुनरुज्जीवित करून ती नियमित व प्रभावी करण्यात यावी.५)भरती प्रक्रिया :शासकीय व सार्वजनिक क्षेत्रातील 'जनरल भरती'वरील बंदी तात्काळ उठवून युवकांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात याव्यात.६)कामगार संहिता :सोशल सिक्युरिटी कोड व वेज कोड तातडीने आणि प्रभावीपणे अंमलात आणण्यात यावेत.७)स्कीम वर्कर्स :सर्व स्कीम वर्कर्सना शासकीय कर्मचारी दर्जा देण्यात यावा.पी फ , ई.एस.आय, पेन्शन, ग्रेजुएटी, बोनस मिळावे.

नांदेड येथे राज्यस्तरीय बैठक घेऊन एमआरएस पक्ष विलनीकरणाचा अंतिम निर्णय घेणार

- मा. आमदार शंकर अण्णा धोंडगे

बाळंतवाडी येथील कार्यकर्त्यांच्या बैठकीत शिवसेना (शिंदे गट)सोबत जाण्याचा निर्णय

कंधार | संतोष कांबळे

कंधार येथे रविवारी (दि. ८) महाराष्ट्र राज्य समिती (एमआरएस) पक्षाची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत उपस्थित कार्यकर्त्यांनी शिवसेना (शिंदे गट) मध्ये प्रवेश करण्याचा एकमुखी ठराव मंजूर केला. मात्र, पक्ष विलीन करण्याचा अंतिम निर्णय हा राज्यस्तरीय कार्यसमितीच घेईल, अशी स्पष्ट भूमिका एमआरएस पक्षाचे प्रमुख, माजी आमदार शंकरअण्णा धोंडगे यांनी बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत मांडली. गेल्या काही दिवसांपासून शंकरअण्णा धोंडगे यांच्या शिवसेना (शिंदे गट) प्रवेशाची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. चार दिवसांपूर्वी नांदेड येथे आमदार हेमंत पाटील यांनी शंकरअण्णा धोंडगे यांच्या निवासस्थानी भेट दिली होती. त्यानंतर शंकरअण्णांनी शिवसेनेचे प्रमुख व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रत्यक्ष भेट घेतल्याने या चर्चांना अधिक बळ



मिळाले.याच पार्श्वभूमीवर कंधार येथे शंकरअण्णा धोंडगे यांच्या उपस्थितीत एमआरएस पक्षाची बैठक घेण्यात आली. या बैठकीत कंधार-लोहा तालुक्यासह इतर भागातून आलेल्या कार्यकर्त्यांनी शिवसेना (शिंदे गट) मध्ये प्रवेश करण्याचा एकमुखी ठराव घेतला. "शंकरअण्णा धोंडगे हाच आमचा पक्ष आहे. ते जो निर्णय घेतील, तो आम्हाला मान्य असेल, अशी भावना कार्यकर्त्यांनी यावेळी व्यक्त केली.बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना शंकरअण्णा धोंडगे म्हणाले, यावेळी लक्ष्मणराव वंगे,दत्ताजी पवार,सुभाष मोरे,युवा नेते दिलीप धोंडगे,शिवराज धोंडगे हे उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले"शेतकरी संघटनेपासून सुरू झालेल्या माझ्या सुमारे ४० वर्षांच्या राजकीय व सामाजिक चळवळीत राज्यभरातील कार्यकर्ते माझ्यासोबत आहेत. त्यांच्या विश्वासाला तडा जाईल, असा कोणताही निर्णय घेतला जाणार नाही. सर्व कार्यकर्त्यांशी सविस्तर चर्चा करूनच पुढील निर्णय घेतला जाईल." ते पुढे म्हणाले की, "लवकरच नांदेड येथे एमआरएस पक्षाची राज्यस्तरीय कार्यसमितीची बैठक होणार आहे. त्या बैठकीत शिवसेनेत पक्ष विलीन करण्याबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल. त्यानंतरच पुढील राजकीय वाटचाल निश्चित केली जाईल."दरम्यान, एमआरएस पक्षाच्या या भूमिकेमुळे आणि शंकरअण्णा धोंडगे यांच्या हालचालींमुळे नांदेड जिल्ह्यासह मराठवाड्यातील राजकीय वातावरण तापले असून, आगामी काळात मोठ्या राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

युवारंगातून घडविले भारतीय संस्कृतीचे दर्शन

○ युवक महोत्सवाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद ○ 'युवारंग' ज्ञान समृद्धीचे दालन डॉ. अजय अग्रवाल

नागपूर : (दिलीप येवले)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने अंबाझरी मार्गावरील गुरुनानक भवन येथे आयोजित 'युवारंग' मधून विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविले. युवक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी मंगळवार, दि.१० फेब्रुवारी २०२६ रोजी उद्घाटनीय कार्यक्रमात 'युवारंग' ज्ञान समृद्धीचे दालन असल्याचे प्रतिपादन व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अजय अग्रवाल यांनी केले.माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अजय अग्रवाल यांनी भूषविले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अधिसभा सदस्य श्री. सुनील फुडके, श्री. प्रथमेश फुलेकर, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. विजय खंडाळ यांची उपस्थिती होती. युवक महोत्सवाच्या निमित्ताने मंचावर प्रस्तुती सादर करण्याची अर्थात ज्ञानग्रहण करण्याची संधी विद्यापीठाने उपलब्ध करून दिली आहे. विद्यार्थ्यांनी आपले आयुष्य घडविण्यासाठी संधीचा उपयोग करावा, असे आवाहन पुढे बोलताना डॉ. अग्रवाल यांनी केले. स्पर्धेत यश-अपयश येते. मात्र, ज्ञान कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. त्यामुळे आपणास अवगत असलेल्या कोणत्याही कलेत सहभागी व्हावे. मंचावर उभे राहिल्यानंतर आपणातील भय निघून जात संवाद सोपा होतो, आत्मविश्वास वाढतो, त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपले सर्वोत्कृष्ट सादरीकरण करावे असे डॉ. अग्रवाल म्हणाले. अधिसभा सदस्य श्री. सुनील फुडके यांनी विद्यार्थ्यांना आपली प्रतिभा सादर करण्याची संधी युवा महोत्सवातून मिळत असल्याचे सांगितले. सोबतच सर्व अधिसभा सदस्य विद्यार्थ्यांच्या अडचणी तसेच समस्यांना घेऊन गंभीर असल्याचे त्यांनी सांगितले. अधिसभा सदस्य श्री. प्रथमेश फुलेकर यांनी मोठ्या संख्येने महाविद्यालय तसेच विद्यार्थी या सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी झाल्याचे सांगत सर्व विद्यार्थ्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन श्री प्रकाश शुक्ला यांनी केले तर आभार डॉ. विजय खंडाळ यांनी मानले.



विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद
युवक महोत्सवाच्या निमित्ताने विद्यापीठात आयोजित विविध स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभाकक्षात सकाळच्या सत्रात 'सध्याची परराष्ट्र आणि आर्थिक धोरणे भारताला जागतिक सत्ता बनवेल' या विषयावर वादविवाद स्पर्धा पार पडली. वादविवाद स्पर्धेत विविध महाविद्यालयातील ६६ संघांनी सहभाग घेतला. भारत जगात नवीन आर्थिक महासत्ता म्हणून उदयास येत असताना परराष्ट्र आणि आर्थिक धोरणे कशा प्रकारे राबविली जावी, या विषयाच्या बाजूने आणि विरोधात विद्यार्थ्यांनी आपली परखड मते व्यक्त केली. याच ठिकाणी दुपारच्या सत्रात आयोजित प्रश्नमंजुषा स्पर्धेत ६४ संघांनी सहभाग घेतला.

भारतीय संस्कृतीची छाप
गुरुनानक भवन परिसरातील ललित कला विभाग व छंद मंदिर येथे आयोजित चित्रकला, भित्तीचित्र, रांगोळी, मातीकाम तसेच चिकटकला या कला प्रकारातून विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रतिकृतीत भारतीय संस्कृतीची छाप दिसून आली. विद्यार्थ्यांनी भारतीय सण तसेच माझे स्वप्न या विषयावर कुंचल्यातून रंग भरले. रांगोळी स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध रंग भरत भारतीय सणांचे महत्त्व अधोरेखित केले. मातीकला तसेच चिकटकला प्रकारात विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीचे वर्णन करणाऱ्या प्रतिकृती साकारल्या. त्याचप्रमाणे व्यंगचित्रातून समाजातील दुष्ट प्रवृत्तींवर प्रहार केला. चित्रकला प्रकारात ४४, भित्तीचित्र स्पर्धेत ५१, मातीकाम स्पर्धेत ३७, व्यंगचित्र स्पर्धेत ३१ चिकटकला (कोलाज) स्पर्धेत २७ तर रांगोळी स्पर्धेत ६४ स्पर्धकांनी सहभाग घेतला.

नाट्य कलेतून मांडले सामाजिक वास्तव
गुरुनानक भवन येथे लघु नाटिका (स्किट), मूकनाट्य (माईम), नक्कलकला (मिमिक्री), पाश्चिमात्य एकल गायन, पाश्चिमात्य एकल वादन आदी विविध कला प्रकाराचे सादरीकरण करण्यात आले. लघु नाटिका, मूकनाट्य तसेच नक्कलकला आदी नाट्य प्रकारातून विद्यार्थ्यांनी सामाजिक वास्तव मांडले. तंत्रज्ञानाच्या युगात जगत असताना देखील कौटुंबिक हिंसाचाराला आजही महिलेला सामोरे जावे लागते. महिला अत्याचार यासह विविध विषयांवर सामाजिक संदेश देणारे नाट्यप्रकार विद्यार्थ्यांनी प्रस्तुत केले. लघु नाटिका प्रकारात २८ संघ, मूक नाट्य प्रकारात ११, नक्कल कला प्रकारात २२ पाश्चिमात्य एकल गायन स्पर्धेत २२ तर पाश्चिमात्य एकल वादन स्पर्धेत १२ संघ सहभागी झाले होते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासाठी भारतीय भाषांची आवश्यकता - मा. कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर

-विद्यापीठात भारतीय भाषांची समान शब्दावली विषयावर राष्ट्रीय कार्यशाळा

नागपूर : (दिलीप येवले)
नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासाठी भारतीय भाषांची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा हिंदी विभाग आणि भारतीय भाषा समिती नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा भाषा भवन येथे करण्यात आले आहे. कार्यशाळेचे उद्घाटन करताना मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी कुलगुरू डॉ. क्षीरसागर मार्गदर्शन करीत होत्या. 'हिंदी आणि मराठी भाषांच्या विशेष संदर्भात : भारतीय भाषांचे सामान्य शब्दसंग्रह' या विषयावर आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनीय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी भूषविले प्रमुख अतिथी म्हणून भारतीय भाषा समितीचे सल्लागार प्रो. आर. सर्राजू, विशेष अतिथी म्हणून महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा येथील प्रो. अवधेश कुमार, हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे यांची उपस्थिती होती. भारतीय भाषांच्या शब्दसंपदेचा आधार घेत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे लक्ष प्राप्त करता येईल, असे कुलगुरू डॉ. क्षीरसागर पुढे बोलताना म्हणाल्या. वापर होत नसल्याने आपल्या परंपरेतील अनेक शब्द विस्मृत झाले आहेत. भाषेला समृद्ध करणाऱ्या शब्दांचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. यातून शिक्षणाचे भारतीय स्वरूप देखील समजण्यास मदत होईल,



असे कुलगुरू म्हणाल्या. हिंदी-मराठी शब्दांच्या साम्यतेचे कारण दोघांचीही समान लिपी असल्याचे त्यांनी सांगितले. दोन्ही भाषा व्युत्पत्ती शास्त्रीयदृष्ट्या समान आहेत म्हणूनच त्यांचे शब्द खूप समान असल्याचे कुलगुरू डॉ. क्षीरसागर म्हणाल्या. प्रमुख अतिथी भारतीय भाषा समितीचे सल्लागार प्रो. सर्राजू यांनी आपल्याला भाषणात मूलभूत शब्दांच्या निर्मितीचा विचार करावा लागेल, असे सांगितले. शब्द निर्माण करणारी आपली पद्धती अधिक प्रामाणिक आणि वैज्ञानिक राहिली असून त्यावर पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे. आपल्या शब्दसंपदेत नवीन शब्दांची निर्मिती करीत आपण लिप्यंतरण आणि भाषांतर करण्यापासून वाचू शकतो, असे त्यांनी सांगितले. उपसर्ग, प्रत्यय इत्यादी अनेक पैलूंवर चर्चा करीत या विषयाच्या अनुषंगाने आपला दृष्टिकोन सादर केला. हिंदी-मराठीच्या स्वरूपानुसार नवीन शब्द तयार करण्यावर त्यांनी भर दिला. विशेष अतिथी प्रो.अवधेश कुमार यांनी सर्व भारतीय भाषांच्या नैसर्गिक समानतेबद्दल विचार करण्याची अपेक्षा व्यक्त केली. प्रास्ताविक करताना हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे यांनी कार्यशाळेची संकल्पना स्पष्ट करताना भारतीय भाषांची समान शब्दावली राष्ट्रीय शैक्षणिक अभ्यासक्रम निश्चित करण्यास मदत करेल, असे सांगितले. आपली राष्ट्रीय एकता नेहमीच भाषिक पायावर आधारित राहिली असल्याचे देखील त्यांनी सांगितले. कार्यशाळेत देशभरातून आलेले हिंदी, संस्कृत मराठी भाषेचे तज्ञ भाग घेत आहे. प्रो. अरिमर्दन कुमार त्रिपाठी, आगरा, प्रो. महेंद्र ठाकुरदास, पुणे, प्रो. कृष्ण कुमार, रामटेक, प्रो. कुबेर कुमावत, अमलनेर, प्रो. भूषण भावे, गोवा, डॉ. शैलेन्द्र लेंडे, डॉ. संजय पळवेकर, डॉ. विजय कळमधार यांच्यासह अनेक विषय तज्ञ आणि संशोधक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. सुमित सिंह यांनी केले तर आभार डॉ. कुंजनलाल लिल्हारे यांनी मानले.

विभागीय आयुक्त कार्यालयात 'मराठी भाषा पंधरवडा' साजरा

विविध स्पर्धांचे आयोजन आणि उत्स्फूर्त सहभाग

नागपूर, (दिलीप येवले) :
विभागीय आयुक्त कार्यालयात आज विविध स्पर्धांचे आयोजन करून मराठी भाषा पंधरवडा साजरा झाला. या कार्यक्रमात विविध शासकीय कार्यालयांचे अधिकारी-कर्मचारी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. आयुक्तालयातील सभागृहात आयोजित या कार्यक्रमाचे उद्घाटन अपरआयुक्त सामान्य प्रशासन तेजुसिंग पवार यांच्या हस्ते झाले. महसूल अपर आयुक्त राजेश खवले, रो.ह.यो. सहआयुक्त अविनाश हदगल, मागासवर्ग



कक्षाच्या उपायुक्त डॉ. हंसा मोहने उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या संयोजक तथा सहायक आयुक्त भूसुधार शिल्पा सोनुले, स्पर्धेचे परीक्षक अध्यापक महाविद्यालयाचे प्रा.डॉ. शैलेश गायकवाड, बाया कर्वे होकेशनल ट्रेनिंग इन्स्टिट्यूटच्या प्राध्यापक अश्विनी बुजोणे, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या स्कूल ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी चे प्रा.डॉ.प्रवीण गेडाम यावेळी उपस्थित होते. श्री. राठोड आणि श्री. खवले यांनी मराठी भाषेला मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा, मराठीतील विविध भाषा व्यवहार आणि मराठीच्या संवर्धनासाठी आवश्यक प्रयत्न याबाबत विचार मांडले. मराठी भाषेच्या महत्वावर आधारित निबंध लेखन स्पर्धा, शासनस्तराहून राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांवर आधारित चारोळी व घोषवाक्य स्पर्धा, शब्दकोडे आणि कविता वाचन स्पर्धा यावेळी घेण्यात आल्या. विभागीय आयुक्तालयातील विविध विभाग, संचालक माहिती व जनसंपर्कम महासंचालनालय, लेखा व कोषागारे,नागरी हक्क संरक्षण, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पोलीस,वने,सार्वजनिक बांधकाम आदी विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी या स्पर्धांमध्ये सहभाग घेतला.कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने झाली. शिल्पा सोनुले यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. लवकरच स्पर्धेचा निकाल जाहीर होणार असून बक्षीस वितरण होईल.

अंशी वर्षाच्या आजीने केला भजनाचा नाद

तळेगाव प्रतिनिधी (राजेंद्र खंडारे)
संपूर्ण इकडे तिकडे गजानन महाराज जयंती साजरी करण्यात आली पण तळेगाव येथे सुद्धा शिक्षकांलनी येथे गजानन महाराज चे देवस्थान आहे आणि त्या दिवशी गजानन महाराज ची पालखी संपूर्ण गावांमध्ये फिरत असताना तळेगाव येथील 80 वर्षीय आजी यांनी गजानन महाराजांच्या भजनाचा खूपच आनंद घेतला त्यांनी त्या भजनावर उत्कृष्ट असा प्रदर्शन व गजानन महाराजांच्या भजनावर मंत्रमुग्न होऊन उत्कृष्ट असं नृत्य सादरीकरण भजनाच्या



माध्यमातून त्यांनी केले त्यांना विचारले असता म्हणाले की मी 80 वर्षाचे आहे आणि तंदुरुस्त आहे हे सर्व माझ्या गजानना ची किमया मी वारकरी संप्रदायामध्ये लहानाचे मोठे झाले म्हणून मला सुद्धा सर्व जनतेला सांगायचे आहे की बाबा रे मी 80 वर्षाची असून सुद्धा भजन पुजनाच्या नादी आहे म्हणून तुम्हाला सांगतो की व्यसनाधीन जाऊन आपले शरीर गमावू नका भक्तिमार्गाने लागा तर अशा प्रकारे प्रकृती राहील असा संदेश नवीन जागृत लोकांना देण्यात आला

कामठी येथे पोलिस उपायुक्त कार्यालयासाठी मेट्रो स्टेशनजवळ पर्याप्त जागेबाबत तत्काळ प्रस्ताव तयार करा

- महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

नागपूर, (दिलीप येवले) :
नागपूर शहरासह जवळील ग्रामीण भागापर्यंत मेट्रोचे सक्षम जाळे व सेवा सुविधा आपण निर्माण केल्या आहेत. लवकरच रामटेकच्यादिशेने कामठीसह कन्हानपर्यंतचा टप्पा मेट्रोशी जोडला जाणार आहे. या विस्तारात सुरक्षिततेच्यादृष्टीने योग्य ती सुविधा व कामठी येथे पोलिस उपायुक्त कार्यालयासाठी पर्याप्त पुरेशी जागा कशी उपलब्ध होऊ शकेल याबाबत प्रत्यक्ष पाहणी करुन तसा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले. सद्यास्थितीत ऑटोमोटीव्ह चौकापर्यंत मेट्रो धावत असून कामठीपर्यंतचे काम पूर्णत्वास येत आहे. जिल्ह्यातील विविध विकास कामांबाबत पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालय येथे बैठकीत आढावा घेतला. या बैठकीस आमदार कृष्णा खोपडे, महा मेट्रोचे महाव्यवस्थापकीय संचालक श्रावण



हर्डीकर, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा पुनर्वसन अधिकारी मलिक विराणी, डब्ल्यूसीएलचे वरीष्ठ अधिकारी, उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते, संजय पवार व वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.वेणा प्रकल्पासाठी संपादीत झालेल्या जमिनीचे मूळ मालकांना हस्तांतरण कायद्याच्या चौकटीत झाले का हे तपासून योग्य तो न्यायनिवाडा करणे क्रमप्राप्त आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात येऊन याबाबत आहे ती वस्तुस्थिती समितीने सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले. मौजा सुराबर्डी येथे पोलिस महासंचालनालय नक्षल विरोधी पथक यांना आवंटीत करण्यात आलेल्या शासकीय जमिनीचा नकाशा दुरुस्ती व रेखांकन करुन देण्याबाबत पालकमंत्री श्री.बावनकुळे यांनी निर्देश दिले. याचबरोबर झुडपी जंगलाच्या प्रश्नाचे सोडवणूक न्यायलीन आदेशान्वये तत्काळ करावी असे आदेश त्यांनी जिल्हा प्रशासनाला दिले.

ज्येष्ठांना आरोग्य विषयक व बँक खाते, गुंतवणुकी बाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शन

काटोल/प्रशांत पवार

ज्येष्ठ नागरिक मंडळ काटोल द्वारा ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध कार्यक्रम राबवित असतानाच सामाजिक बांधिलकीतून ज्येष्ठांच्या आरोग्याची काळजी घेतली जाते. व त्या दृष्टीने कार्यक्रमाचे आयोजन नियमितपणे राबविले जाते. दिनांक 10 फेब्रुवारी 2026 ला ज्येष्ठ नागरिक मंडळाची मासिक सभा संपन्न झाली. सर्वप्रथम मंडळाचे अध्यक्ष श्री गजाननराव भोयर, उपाध्यक्ष सूर्याजी राऊत आणि इतर उपस्थित पदाधिकाऱ्यांनी माता सरस्वती व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून दीप प्रज्वलन केले. सभेची सुरुवात खरा तो एकची धर्म या समूहगीताने करण्यात आली. त्यानंतर मागील सभेचे अहवाल वाचन मंडळाचे सहसचिव श्री दिलीप वैद्य यांनी केले. फेब्रुवारी 2026 या महिन्यात ज्येष्ठांना वाढदिवसा निमित्ताने मानाचा दुपट्टा व भगिनींना स्कार्फ देऊन त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला व निरोगी दीर्घ आयुष्यासाठी शुभेच्छा



देण्यात आल्यात.याप्रसंगी श्री मोरेश्वर साबळे, नारायणराव पर्वत, विष्णूजी ढोले, भाऊराव कारोकर यांनी मनोगत व्यक्त केले. निमंत्रित डॉ श्री अतुल गावंडे,राहुल चिंचूलकर, बँकेचे अधिकारी श्री ललित उपासे यांचे शाल व गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले अमेरिकन ओंकोलोजी इन्स्टिट्यूट नांगिया स्पेशालिटी हॉस्पिटल हिंगणा रोड नागपूर येथील प्रख्यात पोट व यकृत विकार तज्ञ डॉ.अतुल गावंडे यांनी पोटाचा, यकृताचा कॅन्सर कशामुळे होतो, कॅन्सर झाल्यास शरीरात काय बदल जाणवतो, कोणती लक्षणे दिसतात, याची माहिती देऊन लगेच डॉक्टर सोबत संपर्क साधून निदान करावे व उपचार करावे असे मोलाचे मार्गदर्शन केले.कॅन्सर होऊ नये यासाठी योग्य आहार , विहार, व्यायाम करण्याचा सल्ला दिला. भारतीय स्टेट बँक काटोल येथील क्षेत्रीय अधिकारी श्री ललित उपासे यांनी, सर्व ज्येष्ठांनी त्यांचे बँक खात्याशी आपल्या जोडीदाराचे(पती किंवा पत्नी) नाव जोडावे, जेणेकरून खातेदाराचे मृत्यू नंतर जोडीदारास तेच खाते सुरू ठेवता येईल. प्रत्येक खात्यास मो. क्रं जोडला असल्याने आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी कोणी ओटीपी मागितल्यास देऊ नये, असाही सल्ला दिला. बँकेचे श्री लोकेश चौधरी यांनी फिक्स डिपॉजीट , व म्युच्युअल फंड यात गुंतवणूक बाबत माहिती दिली.कार्यक्रमाचे संचालन मंडळाच्या संचालिका श्रीमती बेबीताई रोडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार उपाध्यक्ष श्री सूर्याजी राऊत यांनी मानले.याकामी मंडळाचे अध्यक्ष श्री गजाननराव भोयर, उपाध्यक्ष श्री सूर्याजी राऊत, संपर्क सचिव श्री दिलीप वैद्य, संघटन सचिव हिरामण सकर्डे ,कोषाध्यक्ष सदानंद ठाकरे ,संचालक नरेंद्र मानकर, पुंडलिक बाविस्कर यांचे विशेष सहकार्य लाभले, कार्यक्रमाची सांगता पसायदानाने करण्यात आली. स्टेट बँक काटोल शाखा कडून सर्वांना अल्पोपहार देण्यात आला.

मेटपांजरा ग्राम पंचायत येथे शासकीय योजनेचे जन जागृती शिबिर संपन्न

काटोल/प्रशांत

पवारमेटपांजरा ग्राम पंचायत कार्यालय येथे.मेटपांजरा मंडळात तुकडेबंदी कायदा 2025 बाबत जनजागृती करण्यासाठी व संजय गांधी निराधार योजना शिबीर आणि संबंधित कायद्यातील तरतुदी विषयी आणि अंमलबजावणी साठी लोकांना माहिती देण्यासाठी ग्रामपंचायत मेटपांजरा येथे दिनांक 10/02/2026 रोजी शिबिर घेण्यात आले .एम. वाघमारे मंडळ अधिकारी पी. वाघमारे ग्राम महसूल अधिकारी डी. टेकाम ग्राम महसूल अधिकारी आर. दातीर ग्राम महसूल अधिकारी यू. मसराम ग्राम महसूल अधिकारीपी. बोराडे ग्रॅम महसूल अधिकारी एस. गजभिये कोतवाल वाय. वैद्य कोतवाल एस. शेंडे कोतवाल पी. तागडे कोतवाल अनिल नेहारे



सरपंच ग्राम पंचायत मेटपांजरा ग्राम पंचायत कर्मचारी उपस्थित होते मंडळातील सर्व नागरिकांनी शिबिराचा लाभ घेण्यास उपस्थिति दर्शवली.

आमदार कुणावार यांच्यामुळे झाली मोहगांव ग्रा.प मध्ये मोठ्या प्रमाणात विकासकामे

- सरपंच विलास नवघरे

:मोहगांव ग्रामपंचायत कार्यालयात ग्रा.प.सदस्य सत्कार व निरोप समारंभ कार्यक्रम

तालुका प्रतिनिधी (अमोल झाडे)

समुद्रपुर: तालुक्यातील मोहगांव ग्रामपंचायत मध्ये ११ फेब्रुवारी २०२१ रोजी माझ्यावर ईश्वराच्या कृपेने सरपंच पदाची जबाबदारी आली मात्र याआधी कोणताही सरपंच पदाचा किंवा ग्रामपंचायतीचा अनुभव नसताना सुद्धा मनात पारदर्शक प्रशासन ठेवून स्वातंत्र्य काळापासून अनेक मुलभूत सुविधा पासून वंचित राहिलेल्या गावांचा विकास करण्याचे ठाणले आणि आमदार समिरभाऊ कुणावार व मोहगांव ग्रामपंचायतीच्या अंतर्गत येत असलेल्या ५ गावातील नागरीकांच्या आशिर्वादामुळे मला ७५ वर्षापासून तहानलेल्या तावी ,रासा,केसलापार,या तिन्ही गावात जल जीवन मिशन योजनेअंतर्गत लाखो रुपयांची नविन पाणीपुरवठा योजना यशस्वीपणे राबवून येथील नागरीकांची पाण्याची समस्या कायमस्वरूपी भागविण्यासह कधी न झालेले करोडो रुपयांचे विकास कामे माझ्या हातून करण्यात येश आले.याचा मला आनंद आहे.असे मत मोहगांव ग्रामपंचायतीचे सरपंच विलास नवघरे यांनी ग्रामपंचायत सदस्य सत्कार व निरोप समारंभात व्यक्त केले.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच विलास नवघरे तर प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच सपनाताई बाभडे,तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष अनिल धोटे,ग्रामपंचायत अधिकारी अखिल ढोबळे ,मुख्याध्यापक रमेश वाघमारे, कृषी सहाय्यक राम अरगडे,



अक्षय देशमुख आदी मंचावर उपस्थित होते.यावेळी सरपंच विलास नवघरे,उपसरपंच सपनाताई बाभडे,ग्रामसेवक अखिल ढोबळे, संतोष पुरकाम, ग्रामपंचायत सदस्य जगदीश महातळे ,संदीप दातारकर राजुभाऊ परचाके,प्रणाली वांढरे ,सुनिताई वाघाडे,शिलाताई धारणे ,बेबीताई आत्राम,कर्मचारी दौलत शाहरे, अरुण ठाकरे, विलास राऊत अंगणवाडी सेविका छायाताई ओरके, शशिकला ताई कापसे, यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सरपंच नवघरे मार्गदर्शन करताना पुढे म्हणाले की मी सरपंच पदाचा कार्यभार स्वीकारला तेव्हा या ग्रामपंचायतीच्या जुनी इमारत बसण्यायोग्य नव्हती.मात्रफेब्रुवारी २०२१ ते २०२६ या काळात मी कधी थांबलो नाही विविध योजनेतून गरजूंना जवळपास १७० घरकुल मिळवून दिले, नागरीकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी ग्रामपंचायतीचे अनेक कामे सोपी केली.घरातून बाहेर पडताना रोज सरपंचाचा रबरस्टॉप खिशात घेऊन फिरलो.आमदार कुणावार यांनी माझ्या मागणीवरून मोहगांव ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या मोहगांव,तावी,रासा,केसलापार वानरचुवा या पाचही गावाच्या विकासासाठी निधीचा खजीनाच उपलब्ध करून दिली.आणि त्यांच्यामुळेच तिन गावाची पाण्याची समस्या कायमस्वरूपी मार्गी लागली आहे.नविन ग्रामपंचायत ईमारतीसह पाचही गावामध्ये मोठ्या प्रमाणात गावा अंतर्गत सिमेंट रस्ते, नाल्या,समाज भवन,समश्याभुमी शेड,रस्ते,जिल्हा परिषद शाळा वर्ग खोली, अंगणवाडी ईमारत,शिवार रस्ते,गावाला जोडणारे डांबरीकरणाचे रस्ते आदीसह अनेक करोडो रुपयांचे विकास कामे आमदार कुणावार यांच्यामुळे झाली आहे.मात्र हे कामे मंजूर झाल्यानंतर मी थांबलो नाही काम तर सुरू होण्यापर्यंत संबंधितांच्या मागे लागून पाठपुरावा करून कामे पूर्ण करून घेतली ५ गाव आहे गावे मोठी असल्याने अजूनही काही कामे मंजूर आहे तर काही कामे अजूनही शिल्लक आहे.हे सुद्धा कशी करता येईल यासाठी मी प्रयत्नशील आहे.या विकासाच्या गंगेला मोहगांव ग्रामपंचायतमध्ये अवतरविण्यासाठी ज्यांचा सिंहाचा वाटा आहे असे आमदार समिरभाऊ कुणावार व मला यासाठी वेळोवेळी सहकार्य करणारे माझे सहकारी ग्रामपंचायत सदस्य,सर्व वृत्तपत्र व ईलेक्ट्रॉनिक मिडीयाचे पत्रकार,विविधविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी व गावकऱ्यांचे कृतज्ञता व्यक्त करून आभार मानतो असे मत सरपंच विलास नवघरे यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमाला आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, शिक्षक,ग्रामपंचायत कर्मचारी,गावातील गणमान्य व्यक्त उपस्थित होते.

2026 चे राजरत्न पुरस्कार घोषित

नागपूर (दिलीप येवले) –

सेनासाहेब सुभा व हिंदवी स्वराज्य विस्तारक श्रीमंत राजे रघूजी महाराज भोंसले (प्रथम) यांची जयंती व पुण्यतिथी म्हणजेचं 14 फेब्रुवारी त्यांच्या जयंती व पुण्यतिथी निमीत्ताने भोंसले प्रतिष्ठान व महाराजा ऑफ नागपुर ट्रस्ट* च्या वतीने दिल्या जाणाऱ्या राजरत्न पुरस्कार – 2026 ची घोषणा राजरत्न पुरस्कार समितिचे अध्यक्ष नागपूर महाराज राजे मुधोजी भोंसले यांनी पत्र परिषदेत केली. या सोहळ्यास कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी समर्थ सेवा आणि अध्यात्मिक विकास महामार्ग दिंडोरी, अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्रंबकेश्वर चे प. पु. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे, मुख्य अतिथी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी



उद्घाटक कॅबिनेट मंत्री मध्य प्रदेश श्रीमती संपत्तीया उईके, प्रमुख उपस्थितीत भोसले प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजे रघूजी भोंसले (पंचम) उपस्थित राहतील. 2026 च्या राजरत्न पुरस्काराचे मानकरी पत्रकारीता क्षेत्रात विजय साळवी मुंबई, इतिहास वा साहित्य क्षेत्रात प्रा. विजया मारोतकर नागपूर, क्रिडा क्षेत्रात सागर कांबळे पुणे, संगीत व वादन (संस्कृतिक) क्षेत्रात डॉ. संगीता राऊत नागपूर पत्रकारीता क्षेत्रातील छायाचित्रकार विनय शुक्ला नागपूर, वैशिष्ठ्यपूर्ण कार्यासाठी संदीप शिंदे यवतमाळ, व 18 वर्षाखालील वयोगटात वैशिष्ट्यपूर्ण कार्य क्षेत्रात कुमारी मधुरा राजेश मेहेर नागपूर, क्रिडा क्षेत्रात कुमारी क्रिशा रितेश सोनी नागपूर हे आहेत.या पत्र परिषदेला प्रामुख्याने श्रीमंत राजे रघुजी महाराज भोसले (प्रथम) बहुउद्देशीय स्मृती प्रतिष्ठान चे अध्यक्ष राजे रघुजी महाराज भोसले, राजरत्न पुरस्कार समिती मुख्य सचिव ठाकूर किशोरसिंह बैंस, सहसचिव श्याम पाठक, सदस्य क्रमश डॉ. सागर खादीवाला, गजाननराव कावळे, सुखदेव धुर्वे*भोसले प्रतिष्ठानचे राजे जयसिंह भोसले, ॲड. प्रदिप देशमुख, राजकुमार शिर्के, शेखर शाहू या पत्र परिषदेला प्रामुख्याने उपस्थित होते.

न्यू ॲपोस्टोलिक इंग्लिश हायस्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन आणि संस्थापक दिन उत्साहात साजरा

नागपूर (दिलीप येवले) :

न्यू ॲपोस्टोलिक इंग्लिश स्कूलने विविधतेत एकता या संकल्पनेवर आधारित आपला वार्षिक स्नेहसंमेलन आणि संस्थापक दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिष्ठित पाहुण्यांच्या आगमनाने झाली. प्रदीप हेडाऊ, माजी मुख्य आयकर आयुक्त, आयआरएस छत्तीसगड आणि मध्य प्रदेश, श्रीमती सीमा हेडाऊ &- कलाकार अंकशास्त्रज्ञ आणि वास्तुशास्त्र तज्ञ सतीश रणीत आरएसआय रेल्वे पोलीस- पांडुरंग माने & एपीआय रेल्वे पोलीस, राजीव नामपल्लीवार, प्राचार्य डॉ. विनिता बोवर आणि मुख्याध्यापिका डॉ- वंदना बेंजामिन यांनी पाहुण्यांचे हार्दिक स्वागत केले आणि पाहुण्यांचे पारंपरिक लेझीमच्या सादरीकरणाने स्वागत करण्यात आले. याप्रसंगी पालक माजी विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. ज्याने आणि सुंदर पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. हायस्कूल विभागाच्या विद्यार्थिनींनी स्वागतगीत सादर केले. त्यानंतर



कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. शाळेचे संस्थापक कै. बिशप डॉ. व्हिन्सेंट बोवर आणि कै. श्रीमती ॲलिस बोवर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. पाहुण्यांचा परिचय श्रीमती धनलक्ष्मी सुरेश यांनी करून दिला. पाहुण्यांचे भेटवस्तू मुख्याध्यापिका डॉ. विनिता बोवर यांनी शाळेचा वार्षिक अहवाल सादर केला. प्रमुख पाहुणे श्री प्रदीप हेडाऊ यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले- त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शन केले आणि प्रेरणा दिली. नर्सरी ते ज्युनियर कॉलेज पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक सादरी करणातून आपली प्रतिभा सादर केली आणि विविधतेत एकता या संकल्पनेद्वारे संदेश दिला. भारताच्या विविध राज्यांची संस्कृती आणि परंपरा दर्शविणाऱ्या रंगीबेरंगी आणि उत्साही नृत्यांद्वारे मिनी इंडिया सादर करण्यात आला- भुई नृत्य, भांगडा नृत्य, बंगाली, राजस्थानी, लावणी नृत्य, गोंडी नृत्य इत्यादी सादरीकरणाचे सर्वांनी खूप कौतुक केले. चिमुकल्या मुलांचे सादरीकरण हे कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. मान्यवर आणि पालकांनी विद्यार्थी] कर्मचारी आणि व्यवस्थापनाच्या प्रयत्नांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मेधा भांडारकर यांनी केले आणि आभार प्रदर्शन श्रीमती स्वाती चांदे यांनी केले त्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

बीएलओचे उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल माधव सिद्धेश्वरे यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सत्कार

दै जनप्रभात उरण तालुका प्रतिनिधी (विठ्ठल ममताबादे) उरण दि १० बीएलओचे उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल उरण नगर परिषदेचे कर्मचारी माधव काशिनाथ सिद्धेश्वरे यांचा रायगडचे जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी सत्कार केला आहे.माधव सिद्धेश्वरे हे मतदार यादीचे पुनरनिरीक्षण कामी बीएलओ (BLO) म्हणून अतीशय जबाबदारीने गेले अनेक वर्षे काम करत आहेत. खऱ्या अर्थाने लोकशाही टिकली पाहीजे यासाठी उरण नगर परिषदेचे कर्मचारी माधव सिद्धेश्वरे यांनी आपले काम प्रामाणिकपणे



शिस्तबद्ध पद्धतीने केल्याबद्दल म्युनिसिपल एम्प्लॉइज युनियनचे खजिनदार तथा कर्मचारी माधव सिद्धेश्वरे यांना रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किसन जावळे यांच्या शुभहस्ते जिल्हाधिकारी कार्यालय , अलिबाग येथे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.प्रामाणिक व कर्तव्यदक्ष असलेले कर्मचारी माधव सिद्धेश्वरे यांना म्युनिसिपल एम्प्लॉइज युनियनच्या सर्व पदाधिकारी तसेच सर्व कामगार कर्मचारी यांनी त्यांना शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.जिल्हाधिकारी यांच्या हस्ते पुरस्कार मिळाल्याने माधव सिद्धेश्वरे यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

वृक्षतोड वाढली! वनविभागाचा अधिकारी कोण हप्ते घेतोय?

हिंगोली/ रुपेश एंगडे वसमत तालुक्यात अवैध वृक्षतोड होत असून वृक्षतोडीला वेग आला आहे. शहराच्या भवताली असणाऱ्या सर्व रस्त्यांवर टक्टरच्या मदतीने मोठ्या प्रमाणात वाहतुक वाढली आहे. शहरातलगत अरामशिन देखिल वाढल्या आहेत. बेकायदेशीर विटभट्या देखिल मोठ्या प्रमाणात आहेत. यांना लाकुड पुरवणारे अवैध ट्रक्टर वाहतुक देखिल वाढली आहे. लिंबाचे झाडाची वृक्षतोड, सागाची कानडोळा केला आहे. पुर्वी



आरामशिनच्या चौकशी केल्यास वृक्षतोडीची काळाधंदा बाहेर येईल. वृक्षतोडीकडे वनविभाग प्रशाससनाने जानुन बुजुन पवार यांच्यावरती लाच मागत असल्याची पुष्टी करुण ग्रामिन पोलीस स्टेशन, वसमत येथे गुन्हे दाखल करण्यात आले होते. परंतु त्यानंतर आता देखिल वृक्षतोड होऊन अवैध वाहतूक वाढली आहे. मग आता वनविभागातील कोणता अधिकारी, कर्मचारी हप्ते घेत आहे? असा प्रश्न उपस्थित होतो. या प्रश्नांच्या उत्तरासांठी विभागीय वन अधिकारी यांनी तपास करूण गुन्हेगार कर्मचाऱ्यावर कारवाई करावी आणि उपस्थित झालेल्या प्रश्नाचे उत्तर द्यावे यासाठी जनता उत्सुक आहे.

रायगडमध्ये कॉंग्रेसचा झेंडा डौलाने फडकतोय - महेंद्रशेठ घरत

'सुखकर्ता'वर महेंद्रशेठ घरत यांनी केला विजयी उमेदवारांचा सत्कार

उरण दि १०(विठ्ठल ममताबादे) महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांत महाराष्ट्रात भाजपची घोडदौड सुरू आहे. आमचा मित्र पक्ष असलेल्या शेकापची रायगड जिल्ह्यात अनेक वर्षे एकहाती सत्ता होती, परंतु त्यांनाही यंदाच्या जिल्हा परिषद निवडणुकीत एकही जागा जिंकता आलेली नाही. असे असताना रायगडमध्ये आम्ही महाविकास आघाडीच्या माध्यमातून तीन जागा लढवल्या आणि दोन जिंकल्या. त्यामुळे आमचा कॉंग्रेसचा झेंडा रायगडमध्ये डौलाने फडकतोय, ही निश्चितच अभिमानास्पद बाब आहे. हे सर्व यश महाविकास आघाडीच्या सर्वच कार्यकर्त्यांचे आहे. तन, मन, धनाने काम केलेल्या सर्व कार्यकर्त्यांना मी सॅल्यूट करतोय," असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत म्हणाले. पनवेल तालुक्यातील शेलघर येथे 'सुखकर्ता' बंगल्यावर महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते जिल्हा परिषद सदस्य म्हणून विजयी झालेले डॉ. मनीष पाटील, ऍड.अविनाश ठाकूर यांचा सत्कार मंगळवारी (ता.१०) करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.यावेळी डॉ. मनीष पाटील म्हणाले, "मी जासई मतदारसंघातून बहुमतांनी निवडून आलो. यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आणि सर्व कार्यकर्त्यांनी मनापासून काम केले, हे मी कधीही विसरणार नाही. धनशक्तीविरुद्ध आमचा लढा होता, तो आम्ही आमचे नेते महेंद्रशेठ घरत यांच्या मार्गदर्शनाखाली जिंकला आहे." यावेळी अविनाश ठाकूर म्हणाले, "महाविकास आघाडीचे सर्वच नेते आणि कार्यकर्त्यांच्या बळावर मी



जिंकलो. जिल्हा परिषदेची लढाई सोपी नव्हती, पण जनशक्ती आमच्या मागे होती. त्यामुळे आमचा विजय झाला. त्यामुळ सर्व कार्यकर्त्यांचे मी मनापासून आभार मानतो."उरण तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे म्हणाले, "आमच्या मागे ठामपणे महेंद्रशेठ घरत होते. माजी आमदार मनोहर भोईर, उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर आणि शेकाप, मनसेचे पदाधिकारी आणि कार्यकर्तेही हिरीरीने प्रचारात उतरले होते. त्यामुळे हा कार्यकर्त्यांचा विजय आहे.""उरणमध्ये पंचायत समितीवर महाविकास आघाडीचीच सत्ता येईल, असे मी म्हणालो होतो, ते कार्यकर्त्यांनी अपार मेहनतीने करून दाखवले आहे. उरणमध्ये आमचा भावना पॅटर्न चालला, येत्या काळातही आम्ही कार्यकर्त्यांच्या बळावर जोमाने लढू," असेही महेंद्रशेठ घरत यावेळी म्हणाले. यावेळी कॉंग्रेसचे उरण तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे, अलंकार परदेशी, जयवंत पाटील, किरण कुंभार, घनश्याम पाटील, शेखर ठाकूर, अजय म्हात्रे, प्रशांत म्हात्रे, अलंकार पाटील, अजित ठाकूर, मनोज पाटील, मंगेश म्हात्रे, भाई पाटील, समीर ठाकूर, सुनील वर्तक, मीलन म्हात्रे, आकाश ठाकूर आदी काग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मानवता धर्माची शिकवण देणारी माता रमाई आधुनिक युगाची क्रांतिकारक विचारवंत होत्या

(राहुल पवार) विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सुखदुःखात माता रमाई सुखदुःखात बाबासाहेबांच्या सोबत राहिले त्यांच्या जीवनामध्ये अनेक वेळा त्यांना संघर्ष करावा लागला. वैवाहिक जीवनामध्ये दुःख अनेक वेळा त्यांना सोसावं लागले पण त्याची तक्रार कधीही त्यांनी बाबासाहेबांच्या कडे केली नाही मानवता धर्म खऱ्या अर्थाने त्यांनी समाजाला दाखवला. एक प्रतिवता कशी असावी त्याचा आदर्श उदाहरण म्हणजे रमाई माता रमाई एक स्वतंत्र निर्णय घेण्याची क्षमता होत पत्नी सून जीवनाच्या सर्व कर्तव्य यांनी समर्थपणे पार पाडल्या. आशा रमाबाई विचाराची लढाई आज प्रत्येक स्त्रीने त्यांचा आदर्श घेतला पाहिजे.प्रेम म्हणजे खेळ नव्हे.. माझ्या आवडीचा महिना कारण व्हॅलेन्टाइन आठवडा.. मी प्रत्येक गोष्टीत रसिक असल्याने माझ्यासाठी आनंद घ्यायला आणि द्यायला एक क्षणही पुरतो आणि मी भरभरून जगतेही.. व्हॅलेन्टाइन आला कि प्रेमविराना प्रेमाचं



भरतं येतं म्हणजेच बहर येतो असं म्हणुयात.. प्रेम ही आठवडाभर करण्याची कृती नसून तो जगण्याचा सोहळा आहे.. प्रेम म्हणजे अनुभूती आहे.. प्रेम सगळ्याना मिळत नाही.. अनेकजण प्रेमासाठी तडफतात त्यामुळे त्याची चेष्टा करु नका आणि पार्टनरला गृहीतही धरु नका.. प्रत्येक गोष्टीसाठी प्रत्येक क्षणी कृतज्ञता व्यक्त करा.. प्रेम ही मिळवण्याची नाही तर अनुभवण्याची प्रोसेस आहे.. आधी द्या मग मिळेल.. या सर्व गोष्टी समाज परिवर्तन आणि स्त्री् मानवता धर्म प्रेम् आपुलकी प्रतिवता त्या सर्व गोष्टी माता रमाई ही समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे असे ् गौरव उद्गार बापूसाहेब वाघमारे यांनी आपल्या मनोगत व्यक्त केले यावेळी मीनाक्षी वाघमारे या म्हणाल्या की आजच्या सामाजिक जीवनामध्ये ताण तणाव निर्माण होतो अनेक वेळा नवरा बायकोच्या नात्यांमध्ये दुरावा निर्माण होतो पतीकडून खूप अपेक्षा असतात आधुनिक स्त्रीला रमाबाई एक आदर्श उदाहरण आहे प्रतिवता सामाजिक जाणीव याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे रमाबाई आंबेडकर होत्या प्रत्येक स्त्रीने त्यांचा आदर्श घेतला पाहिजे या कार्यक्रमासाठी पत्रकार राहुल पवार धर्मेंद्र वाघमारे जयवंत वाघमारे ज्योतिराम वाघमारे विजय वाघमारे साहेबराव वाघमारे माया वाघमारे सविता वाघमारे शितल वाघमारे सुषमा वाघमारे चंदा वाघमारे मीनाक्षी वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती प्रास्ताविक शनि वाघमारे यांनी केले आभार बापूसाहेब वाघमारे यांनी केले

कुरुंदकरांनी महाराष्ट्राला व्यापक इतिहासदृष्टी दिली : डॉ. राजा दीक्षित

सातारा (अनिल वीर यांजकडून) :

ज्येष्ठ विचारवंत नरहर कुरुंदकर यांनी महाराष्ट्राला व्यापक इतिहास दृष्टी दिली आहे. तरुण पिढीला त्यांच्या विचारांचे प्रचंड आकर्षण आहे.असे मत मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे माजी अध्यक्ष,इतिहासाचे व्यासंगी अभ्यासक,भाष्यकार व ज्येष्ठ विचारवंत डॉ. राजा दीक्षित यांनी व्यक्त केले. नरहर कुरुंदकर यांच्या स्मरणार्थ येथील श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह (थोरले)महाराज, नगरवाचनालयाच्या पाठक हॉलमध्ये आयोजित केलेल्या 'नरहर कुरुंदकर यांची इतिहास दृष्टी ' या विषयावरील विशेष व्याख्यानात डॉ. दीक्षित बोलत होते. विचारमंचावर ज्येष्ठ अभ्यासक किशोर बेडकिहाळ व दिनकर झिंब्रे उपस्थित होते. डॉ. राजा दीक्षित म्हणाले, "नरहर कुरुंदकर महाराष्ट्रातील मोजक्या,दुर्मिळ थोर विचारवंत, लेखक,भाष्यकारापैकी एक होते. त्यांच्या लेखन व भाषणात प्रकट झालेली जीवनदृष्टी आणि इतिहास दृष्टी एकच आहे. ती विवेकवादी व बुद्धिवादी आहे. नरहर कुरुंदकर पुरोगामी तत्त्वज्ञ व जात विरोधी होते. विषमतेचा पुरस्कार करणारी मनुस्मृति त्याज्य असल्याचे त्यांनी मानलेय. सेक्युल्यारिझम बाबतची त्यांची भूमिका अतिशय स्पष्ट व परखड भारतीय संविधान मूल्याशी सुसंगत अशी



डॉ राजा दीक्षित यांचा सत्कार करताना किशोर बेडकिहाळ शेजारी दिनकर झिंब्रे.

आहे." भारतीय संविधानाला छेद देणाऱ्या हिंदू राष्ट्राच्या कल्पनेस त्यांनी रोखठोक सवाल केले आहेत.ते पुढे म्हणतात,"इतिहासकारांनी वर्तमानाची गरज आणि भूतकाळाचा अचूक अन्वयार्थ लावण्याची गरज आहे समाज परिवर्तन व सुधारण्यासाठी ते आवश्यक आहे.इतिहासकाराची भूमिका भाऊकपणा ऐवजी वस्तुनिष्ठ असली पाहिजे. ऐतिहास कादंबरीचा गाभा केवळ घटना नाही तर इतिहास पुरुषाचे सार्वकालिक व्यक्तिमत्वाचे व अंत:प्रवाहाचे आकलन असले पाहिजे. रोमांचकारक घटनांचा मोह टाळला पाहिजे.वस्तुनिष्ठता जोपासली पाहिजे.आजचे औपचारिक इतिहास वर्तुळातील इतिहासकार यांचे लेखन अतिशय तोकडे व असमाधानकारक आहे. मराठी लेखन परंपरेतील छुपा जातीवाद हे मोठे वैगुण्य आहे. लेखकाला सामाजिक उत्तरदायित्व असले पाहिजे. नरहर कुरुंदकर इतिहास अभ्यास निर्मिती मंडळावर असते तर फार बरे झाले असते. ते मूर्ती पूजक तसेच मूर्तीभंजकही होते. मूर्तीभंजन करताना त्यांनी कमालीची वस्तुनिष्ठता व तटस्थता बाळगली होती. छत्रपती शिवाजी महाराज ईश्वर नव्हते. तर श्रेष्ठ राजे होते. जनतेच्या स्वातंत्र्याचे प्रतिनिधी होते त्यांनी मराठी भाषा,मराठी राज्य तसेच आरमार व भक्कम किल्ले बांधायचे मौलिक काम केले आहे. कुरुंदकरांच्या शिवचरित्रात महाराजांचा एकेरी उल्लेख असला तरी तो त्यांनी आदरपूर्वक केलेला आहे. भारतीय घटनेचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकर हे श्रेष्ठ ज्ञानर्षी होते. त्यांची संविधान निर्मितीची कामगिरी मोलाचीच आहे. पण भारतीय संविधान स्वातंत्र्य चळवळीच्या उत्क्रांतीतून आकाराला आले आहे. हे डोळसपणे समजून घेतले पाहिजे. असे कुरुंदकर म्हणतात." किशोर बेडकिहाळ यांनी प्रास्ताविक केले व दिनकर झिंब्रे यांनी आभार मानले. कार्यक्रमास मान्यवर लेखक, संशोधक, अभ्यासक, विविध संस्था, संघटनांचे कार्यकर्ते नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.